अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मनाचा गुण होय.

# अन्नासंबंधीं नवीन शोध–१

युद्धकाळीं उद्भवणाऱ्या भीषण परिस्थितीमुळें सर्व बाबतींत जो निकराचा प्रयत्न करावा लागतो, त्याचे परिणामीं पुष्कळ वेळां महत्वाचे शास्त्रीय शोध लागत असतात. या युद्धांत अन्नासंबंधी बरेच नवीन शोध लागलेले आहेत. त्यांचा सारांश डॉ. अर्विन पुले (व्हिअेना) यांच्या पुस्तकावरून पुढें दिला आहे (न्यूट्रिशन ॲंड व्हिक्टरी, १९४१).

या शोधांतील सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे अतिरिक्त मीठ, प्रोटीन व साखर यांचे दुष्परिणाम आतां सिद्ध झाले आहेत आणि हे सर्व पदार्थ कमी करून पोटॅशिअम व व्हिटॅमीन दिल्याने शरीराची कार्यक्षमता वाढून थकवा किंवा रोग या दोहोंचा जोराने प्रतिकार करतां येतो हें स्पष्ट झालें आहे.

गेल्या युद्धांत युद्धपरिस्थितीमुळें जे रोग उद्भवले, त्यांपैकी मुख्य म्हणजे टायफॉइड, कॉलरा, आमांश, टिटॅनस आणि न्युमोनिया हे सांसर्गिक रोग, मूत्रपिंडांचे विकार, व भुकेमुळे येणारी सूज. त्या काळीं डाक्तरांची अशी कल्पना असे की जंतूमुळे जे रोग उत्पन्न होतात ते नाहीसे करण्याचा अेकच एक मार्ग म्हणजे जंतूंचा नायनाट करणें. शरीरांत प्रतिकारशक्ति असते याची थोडीबहुत कल्पना होती, परंतु योग्य अन्नाने ही प्रतिकारशक्ति कोठपर्यंत वाढवितां येते याची अटकळ त्या वेळीं कोणालाही नव्हती.

आज हें कळूं लागलें आहे की शरीराच्या आम्लतेमुळे रोगाला जोर येतो, शरीरांत मीठ जितकें जास्त असेल तितकी जंतूंना मदत होते, आणि सांसर्गिक

रोग्यांच्या अन्नांतून मीठ अजीबात काढून टाकणें हा उपचाराचा अेक महत्वाचा भाग आहे. त्याचप्रमाणें जंतूंमुळे जें विष आपल्या शरीरांत उत्पन्न होतें, तें घालवण्याचा उत्तम मार्ग म्हणजे साखर मुबलक खाणें. यांत अेकच गोम आहे की साखर शुद्ध, म्हणजे पांढरी सफेत, करतांना त्यांतील सर्व व्हिटॅमिनें व खनिज पदार्थ नाहीसे होतात, म्हणजे ते काकवीचे रूपाने बाहेर पडतात. तेव्हां साखरेअैवजीं गूळ खाणें चांगलें आणि उसाचा रस त्याहूनही उत्तम. पण ज्यांना साखरच खावीशी वाटत असेल, किंवा खावी लागत असेल, त्यांनी त्यांतले काढून टाकलेले महत्वाचे पदार्थ काकवीचे रूपाने खावे. तरच पुरा फायदा मिळेल.

मूत्रपिंडाचे वरचे बाजूला अॅड्रेनल कॉर्टेक्स नांवाची जी ग्रंथि असते, तिच्या अंतःस्रावाचें महत्वही आतां कळलें आहे. कोणत्याही सांसर्गिक रोगांत या ग्रंथीचें काम नीट होत नाही आणि ही कमतरता भरून काढल्यास रोगप्रतिकार अधिक सुलभतेने होतो असें आतां सिद्ध झालें आहे. या बाबतींत अेक गोष्ट लक्षांत घेतल्यास याचा उलगडा होअील. अन्नांतील व्हिटॅमिनांचें महत्व सर्वांस कळलें आहे, परंतु **बी** व **सी** हीं व्हिटॅमिनें अंगीं लागण्याकरतां या अंतःस्रावाची जरूर असते, नपेक्षा तीं कितीही प्रमाणांत दिलीं तरी त्यांचा उपयोग होत नाही. उदाहरणार्थ डिफ्थेरिआमधे **सी** व्हिटॅमीनचा अत्यंत उपयोग होतो, पण त्याचा पुरा उपयोग व्हायला पाहिजे असेल तर त्याबरोबर वरील अंतःस्राव द्यावा लागतो. साखर अंगीं लागण्यासही याच अंतःस्रावाचा उपयोग होतो. 'अिन्फंटाअिल पॅरॅलिसिस' या रोगांत साखर, कॅल्सिअम व **बी** व्हिटॅमीन भरपूर दिल्याने रोग हटतो. मज्जातंतूंच्या सुस्थितींसही या अंतःस्रावाचा उपयोग असतो, कारण ही स्थिति **बी** व्हिटॅमीनवर अवलंबून असते, आणि या अंतःस्रावाशिवाय **बी** व्हिटॅमीनचा उपयोग नाही.

अशा रीतीनें रोगप्रतिकाराची तयारी करून ठेवल्यास ती रोगाची लस टोंचण्यापेक्षाही अधिक उपयुक्त आहे, कारण लशी फक्त कांहीं रोगांपुरत्याच असतात आणि ही शरीराची तयारी कोणत्याही रोगाविरुद्ध उपयुक्त असते.

# अन्नासंबंधी नवीन शोध-१

गेल्या युद्धांत अेकदां न्युमोनिआची सांथ आली, तींत शेंकडा ५० पेक्षा जास्त लष्करी रोगी मरूं लागले. 'आमच्या शिक्षकांनी आम्हाला सांगितलेलें होतें की न्युमोनिआ तीव्र स्वरूपाचा असल्यास तो बरा होत नाही, पण हें तीव्र स्वरूप कशामुळें होतें हें कोणी सांगेना. हें स्वरूप शरीराच्या स्थितीवर अवलंबून असतें हें आतां कळून चुकलें आहे.' आतां त्याचें स्वरूप कितीही तीव्र असलें तरी तो मीठ बंद करून, फळें, पालेभाज्यांचा रस, साखर आणि व्हिटॅमिनें भरपूर दिल्यानें खात्रीने बरा करतां येतो. या उपचारांच्या परिणामीं शरीरांतील सोडिअम कमी होऊन पोटॅशिअम भरपूर मिळतो व शरीराची आम्लता कमी होते. साखर व पोटॅशिअम यांचा हृदयावर परिणाम होतो आणि मीठ कमी केल्याने फुप्फुसांनाही आराम वाटतो आणि कोणत्याही औषधाचा उपयोग अधिक प्रमाणांत होऊं लागतो.

याचा अेकंदर सारांश असा की शरीराच्या आम्लतेने संसर्गाचा संभव वाढतो आणि प्रतिकारशक्ति कमी होते. तसेंच मिठाने रोगांचा जोर वाढतो. याउलट पोटॅशिअम, साखर व व्हिटॅमीन यांनी रोगांचा प्रतिकार होतो. लस टोंचल्याचा परिणाम देखील सर्वांवर सारखा होत नाही, आणि याचें मुख्य कारण हेंच की शरीराची आम्लता, प्रोटीन आणि मीठ यांचें प्रमाण प्रत्येकाच्या शरीरांत वेगळें असतें.

मूत्रपिंडांच्या रोगांत देखील मीठ कमी करणें, आम्लता कमी करणें, आणि पोटॅशिअम व **सी** व्हिटॅमीन भरपूर देणें, हे यशस्वी उपचार आहेत.

मलावरोध **बी** व्हिटॅमीनच्या कमतरतेने होतो, आणि यावर यीस्टचा उपयोग होतो तो यामुळेच. पुष्कळ रोगांत अॅड्रेनल कॉर्टेक्स व **बी** व्हिटॅमीन यांची कमतरता उत्पन्न होते आणि यामुळे मलावरोध होतो. भुकेने शरीराला सूज येते, याचें कारणही **बी** व्हिटॅमीन व अन्नांतील खनिज पदार्थ यांचा अभाव हें होय.

१९३५ साली राष्ट्रसंघाने अेक अन्नसमिति नेमली होती, तिने असें ठरवलें की कांही काम न करणाऱ्या मनुष्याला दररोज २४०० कॅलोरींचा पुरवठा

होईल असें अन्न लागतें. काम करीत असल्यास यांत श्रमांचे मानाने ताशीं ५० ते २०० कॅलोरी मिळवल्या पाहिजेत. त्याच प्रमाणें प्रत्येक मनुष्याला शरीराच्या वजनाच्या अेक हजारांशाअितकें प्रोटीन दररोज लागतें. अन्नांत थोडीबहुत चरबी देखील पाहिजे, परंतु तिचें प्रमाण अजून निश्चित करतां येत नाही. खनिज पदार्थ व व्हिटॅमीन यांच्या दृष्टीने अन्नांत दूध, अंडीं, शरीरांतील ग्रंथि, फळें, मासे आणि मांस, यांचें महत्व अतिशय आहे. खनिज पदार्थ किंवा व्हिटॅमीन साखरेंत बिलकुल नसतात, आणि कॅलोरी मात्र भरपूर असतात, यामुळें साखर जास्त खाणें म्हणजे खनिज पदार्थ व व्हिटॅमीन कमी करणें होय. खनिज पदार्थ व व्हिटॅमीन अन्नांत भरपूर असून त्यांत शक्य तितकें वैचित्र्य असल्यास चांगलें. गव्हांचा कोंडा काढून टाकल्याने कांही महत्वाचे पदार्थ त्याबरोबर जातात. साखर फाजील खाऊं नये, दूध व दुधाचे पदार्थ मुबलक खावे. त्याचप्रमाणें फळें व भाजीपाला यांचें स्थान महत्वाचें आहे, आणि विशेषतः वाढीच्या वयांत व गरोदरपणीं **डी** व्हिटॅमीनची अधिक जरूर असल्यामुळें तें कृत्रिम रीतीने घेणें अिष्ट आहे.

वेगवेगळीं व्हिटॅमिनें अन्नांत किती असावीं याचें जें प्रमाण या समितीने दिलें आहे तें अत्यंत अपुरें आहे. व्हिटॅमिनांचा उपयोग केवळ रोग होऊं नये अेवढाच नसतो, शरीराची कार्यक्षमता वाढवण्याकडे त्यांचा उपयोग असतो, हें लक्षांत घेतल्यास हें प्रमाण बरेंच वाढवावें लागेल आणि म्हणूनच वॉशिंग्टन येथील अमेरिकन समितीने **अे, बी १ व सी** यांचें प्रमाण वरील समितीच्या तिप्पट ठरवलें आहे.

प्रोटीन फक्त मांसांतच असतें असें मानण्याकडे पूर्वी प्रवृत्ति असे, परंतु शाकाहारांतही प्रोटीनचे कांहीं प्रकार असतात, अितकेंच नव्हे तर मांसाचें प्रमाण फाजील झाल्यास तें हानिकारक आहे, असें आतां दिसून आलें आहे. सरासरी मानाने दररोज ५८ ते ७५ ग्रॅमपेक्षां जास्त मांस खाणें हितावह नाहीं (रत्तल = सुमारें ४५४ ग्रॅम). म्हणजे दर आठवड्यास १ रत्तल मांस पुरे आहे, यापेक्षां जास्त खाऊं नये. जास्त खाल्ल्यास मुख्य नुकसान असें होतें की मांसांत

मीठ असतें व तें अंगांत सांचून राहतें, आणि त्यामुळें अंगांत पाणीही सांचतें. याउलट शाकाहारांत पोटॅशिअम जास्त असल्यामुळें मीठ सांचून रहात नाही आणि शरीराची आम्लता कमी होते. आम्लता वाढल्यानें सांधे दुखतात व दांत खराब होतात. अितकेंच नव्हे तर मांसांतील प्रोटीन व मीठ फाजील झाल्यास आपली प्रतिकारशक्ति कमी होते, संसर्गाचा संभव वाढतो आणि थकवाही लवकर येतो. अशा लोकांनी कितीही फळें व भाजीपाला खाल्ला तरी त्यांचा उपयोग होत नाही. ( अपूर्ण )

---

# मृतात्म्यांचा अितिहास–७

मी पूर्वी सांगितलें की लबाडी ओळखण्यास अवधि सांपडेल अितके दिवस ज्यांनीं धंदा केला आहे, असे सर्व प्रमुख मध्यस्थ लबाडींत सांपडलेले आहेत. फॉक्स बहिणींनीं स्वतःच्या लुच्चेगिरीची कबुली दिली अितकेंच नव्हे तर सर्व मध्यस्थ आमच्यासारखेच लबाड असतात असें विधान केलेलें आहे. शिवाय प्रत्येकाची लबाडी व्यक्तिशः सांपडलेली आहे. उदा० ( येथें मॅकेब यांनीं सुमारें ४० मध्यस्थांची यादी दिली आहे ).

या मध्यस्थांचे पुरस्कर्ते पुष्कळ वेळां सांगत असतात की डी. डी. होम आणि स्टेन्टन मोझेस यांना कधीं पकडलेले नाहीत, पण ही थाप आहे. रेव्हरंड स्टेन्टन मोझेस हे अेक अिंग्रज पाद्री होते. केंब्रिज युनिव्हर्सिटींतील बरेच प्रोफेसर त्यांचे स्नेही होते. ते कधीं जाहीर बैठकी करीत नसत आणि फक्त निवडक लोकांनाच त्यांच्या बैठकींना हजर राहण्याची परवानगी असे. पण अितकें करूनही त्यांची लबाडी निदान अेकदां तरी सांपडलेली आहे. जेथें परीक्षा होण्याचा संभव आहे अशा ठिकाणीं कोणताहि धंदेवाईक मध्यस्थ हल्लीं हवेंत तरंगण्याचें किंवा गूढ शक्तीने लांबून कांहीं पदार्थ आणण्याचें ढोंग करणार नाहीं. परंतु रेव्हरंड मोझेस यांचे प्रेक्षक निवडक असल्यामुळे ते हीं ढोंगें करीत असत,

अेवढ्यावरूनच त्यांच्यावर कितपत विश्वास ठेवावा हें दिसेल. शिवाय मृतात्म्यांशीं त्यांची विशेष जानपहचान असूनही त्यांनीं अनेक ढोंगी मध्यस्थांना पाठिंबा दिलेला आहे. यावरून ते स्वतः किती प्रामाणिक असतील याची कल्पना करावी.

डी. डी. होमचे प्रयोगही बहुधा खाजगी बैठकींतच होत असत, पण तरीही ते अनेक वेळां पकडले गेल्याची हकीकत पॉडमोर यांनी आपल्या पुस्तकांत दिली आहे. होम यांचें अेकंदर जीवनच लफंगेपणाचें होतें आणि कॉनन डॉअिल यांनी आपल्या ऑस्ट्रेलियामधील प्रवासासंबंधी जे पुस्तक लिहिलें आहे, त्यांत आपल्याला त्याच्या लबाडीचा पुरावा त्या देशांत मिळाल्याचें नमूद केलें आहे. होम याचें मूळचें नांव ह्यूम होतें, पण आपला बाप ' अर्ल ऑफ होम 'चा अनौरस मुलगा होता असें सांगून बड्या लोकांशीं नातें जोडण्यासाठी त्याने आपलें नांव बदललें. यामुळे त्याला खरोखरच बड्या लोकांत मिसळतां आलें, आणि अेका श्रीमंत बाअीशीं लग्न करतां आलें. तो जेव्हां १८५५ सालीं लंडनला आला, तेव्हां मेरिफिल्ड यांनी त्याला लबाडींत पकडला. पुढें १८६८ सालीं अेका श्रीमंत विधवेकडून खोट्या सबबींवर दीड लाख पौंडांपेक्षा अधिक रक्कम मिळवल्याबद्दल त्यावर खटला झाला आणि पॉडमोर व क्लॉड यांनी तो या खटल्यांत सुटला असें खोटें विधान केलें आहे, परंतु त्याला कोर्टाने ते पैसे परत करण्याचा हुकूम दिला आणि त्यावर कोर्टांत लबाडीचा शिक्का बसला. त्याच्या सर्व प्रयोगांत लबाडी दिसते.

होमनंतरचा सर्वांत प्रसिद्ध मध्यस्थ म्हणजे पॅलॅदीनो नांवाची बाअी होती, आणि ती फसवीत होती असें तिच्या चहात्यांनीही कबूल केलेलें आहे. प्रो. मोरेली यांनी तिचा पुरस्कार करतांना देखील म्हटलेलें आहे की तिच्या प्रयोगांपैकी निदान अेक दशांश लबाडीचे होते. याचा अर्थ अितकाच की अेक दशांश वेळां लबाडी सांपडली आणि नअू दशांश वेळां सांपडली नाही. ही मूळची अेक पोरकी पोर, सर्कशींत कामें करीत असे आणि नंतर फसवेगिरीने प्रसिद्धीस आली. ती अत्यंत धार्मिक होती आणि मृतात्म्यांशीं तिचें संघटन विशेष होतें असें तिचे अनुयायी सांगतात. तिची लबाडी १८९४ सालीं ' साय-

किकल रिचर्स सोसायटी ' तील कांहीं लोकांनीं प्रथम बाहेर काढली. नंतर प्रो. ल बों आणि प्रो. दास्त्र यांनीं १९०६ सालीं पॅरिस येथें तिला फजीत केलें, आणि १९०९ सालीं कोलंबिआ युनिव्हर्सिटींत तिची फजीति झाली. फसवेगिरी-शिवाय तिचें चालतच नसे.

याच्या खालोखाल लोकप्रिय मध्यस्थ म्हणजे ' औव्हा सी.' हिची हकीकत वर दिलीच आहे. जवळजवळ तिच्याअितकीच लोकप्रिय म्हणजे कॅथलीन गॉलिगर नांवाची अेक आयरिश मुलगी होती. बेलफास्ट येथील अेक शिक्षक डॉ. क्रॉफर्ड यांनीं १९१६ पासून तिच्या प्रयोगांची हकीकत आपल्या पुस्तकांत दिली आहे आणि कित्येक वर्षेपर्यंत लोक याला शास्त्रीय पुरावा समजत असत ! बॅरेट, लॉज, वगैरे प्रमुख लोकांनीं तिचे प्रयोग खरे म्हटले आहेत. परंतु क्रॉफर्ड यांच्या पुस्तकांतील हकीकतीवरूनच मी तिला आपल्या पुस्तकांत १९२० सालीं लबाड म्हटली, आणि त्याच सालीं माझें म्हणणें सिद्ध झालें. डॉ. क्रॉफर्ड यांनी ३० जुलै १९२० रोजीं आत्महत्या केली ! ऑस्ट्रेलियांतील कांहीं लोक मला लिहितात की ही गोष्ट मृतात्म्यांचे पुरस्कर्ते कबूलच करीत नाहीत, परंतु मजजवळ बँगॉर येथील अेका वर्तमानपत्राचा ३१ जुलैचा अंक आहे, आणि त्यांत त्यांनी आत्महत्या केली असा कॉरोनरच्या कोर्टाचा निकाल दिलेला आहे, तेव्हां याबद्दल शंका नाही. त्यांनी आपल्या आध्यात्मिक मित्रांकरतां कांहीं मोहोरबंद पत्रें ठेविलीं होतीं, परंतु तीं कोणीही प्रसिद्ध केलेलीं नाहीत. स्थानिक आध्यात्मिकांनी तीं दाबून टाकलीं, परंतु नंतर फूर्निअे दाल्ब यांनी अेक पुस्तक लिहून या बाअीची लबाडी शाबीत केली आहे.

याच सुमाराला केली नांवाच्या मध्यस्थाला फ्रान्समधें पकडला आणि नॉर्वे, पॅरिस आणि न्यू यॉर्क येथें तीन प्रसिद्ध मध्यस्थांना पकडल्याची हकीकत प्रसिद्ध झाली. जेव्हां जेव्हां कोणा मध्यस्थाची कसोशीनें चौकशी झाली, तेव्हां तेव्हां लबाडीच सांपडलेली आहे. पेन्सिल्व्हॅनिआ युनिव्हर्सिटीने १८८७ सालीं नेमलेल्या कमिशननें चौकशी केली, तेव्हां त्यांना लबाडीशिवाय कांहीही सांपडलें नाही.

गेल्या युद्धाचे वेळीं मध्यस्थांना ऊत आला असें वर लिहिलें आहे, पण

त्या वेळींही त्यांच्या लबाड्या अेकसारख्या सांपडत होत्या. हॅरी प्राअिस यांनी होपची लबाडी अेका पुस्तकांत सिद्ध केली, आणि लंडनमधील जादूगारांच्या अेका समितीने फोटोग्रॅफींतील लबाडीसंबंधीं अेक खाजगी पत्रक काढलें. नंतर 'सायंटिफिक अमेरिकन' या प्रसिद्ध पत्राने अमेरिकन मध्यस्थांची चौकशी करून ती हकीकत प्रसिद्ध केली. कांहीं दशकांपूर्वी 'लंडन डायालेक्टिकल सोसायटी' या संस्थेनें अशीच एक समिति नेमली होती, आणि अशा प्रत्येक चौकशींत लबाडीच सांपडलेली आहे. शास्त्रीय दृष्टीने चौकशी व्हायला पाहिजे, असें या चळवळीचे पुरस्कर्ते नेहमी ओरडत असतात, पण तशी चौकशी कोणीं केली म्हणजे मात्र त्यांची त्रेधा होते.

'सायंटिफिक अमेरिकन'ने मात्र फाजील सौम्यपणा दाखवला. न्याय म्हणजे फाजील सौम्यपणा नव्हे, याचा त्यांना विसर पडला. पण त्यांच्या समितीपैकी एक नामांकित सभासद हौडीनी हा जादूगार होता, त्याने मात्र गय केली नाही. आज अमेरिकेंत जे मध्यस्थ आहेत आणि मृतात्म्यांकडून खरो-खरच संदेश येतात असें सिद्ध करण्याचा जे आव आणतात, त्यांपैकी अेकही प्रामाणिक नाही असें त्यांनी सिद्ध केलें. जादूगारांनाही नेहमी लबाडी सांपडेलच असा नियम नसतो. स्लेड नांवाच्या प्रसिद्ध सोद्याने केलेले प्रयोग मानवी शक्तीच्या पलीकडचे आहेत असें अेका जर्मन जादूगारानेच लिहून दिलें होतें. ज्या ब्रिटिश जादूगाराने होमला लबाड ठरवला, त्याने नंतर मृतात्म्यांवर विश्वास असल्याचें लिहिलें. हौडीनी असा लेचापेचा नव्हता. अमेरिकेंतील कोणताही मध्यस्थ त्याचे पुढें टिकला नाही. पण युद्धपरिस्थिति अमेरिकेला यूरोपअितकी न जाणवल्यामुळे तेथे मृतात्म्यांना मागणीच कमी होती, आणि तेथें मध्यस्थांचा व्यापार फारसा चालेना. पुरस्कर्त्यांच्याच म्हणण्याप्रमाणें १८५० सालीं अमेरिकेंत २०००० मध्यस्थ होते, ते १९२५ सालीं फक्त १२०० राहिले.

मी ही हकीकत लिहितों अितक्यांत अिंग्लंडांत 'सन्डे क्रॉनिकल' ने मध्यस्थांची चौकशी करण्याकरता अेक समिति नेमली. तींत सर विल्यम ऑर्बथनॉट लेन, प्रो. जूलियन हक्स्ले, प्रो. अे. अेम्. लो, सर अे. सी. डॉअिल,

आणि चार प्रसिद्ध साहित्यिक होते. हॅरोल्ड ओव्हेन्स नांवाचा एक नवीनच मध्यस्थ उपटला होता, त्याचे प्रयोग तपासण्याचें या समितीचें काम होतें. पुरस्कर्त्यांचे मतें हा मध्यस्थ अत्यंत प्रामाणिक होता. त्याला खुर्चीवर बांधून ठेवलें तरीदेखील अेका सुंदर स्त्रीचें भूत तो उत्पन्न करीत असे आणि तें अिकडे तिकडे फिरत असे. पण या समितीच्या लोकांनीं आपल्याबरोबर विजेच्या बत्त्या नेल्या होत्या, आणि त्या लावल्याबरोबर तें भूत म्हणजे खुद्द ओव्हेन्सच अंगावर अेक चादर घेऊन वावरत होता, हें सिद्ध झालें. सर कॉनन डॉअिल यांना देखील ही लबाडी कबूल करावी लागली. या समितीने सर्व मध्यस्थांस आमंत्रण केलें होतें. अितकेंच नव्हे तर शास्त्रीय निरीक्षणाखाली प्रयोग करून कोणीही मध्यस्थ भूत किंवा कोणतीही वस्तु उत्पन्न करील, त्याला पांच हजार डॉलरचें बक्षिस अजूनही लावलेलें आहे. पण विरोधकांच्या काकदृष्टीखाली 'अेक्टोप्लॅझम'चें कांही चालत नाही, आणि अेखाद्या मध्यस्थानें अनुयायांच्या आग्रहावरून तसा प्रयत्न केलाच तर त्याची लुच्चेगिरी ताबडतोब सांपडते. असा प्रयत्न सिम्पसन नांवाच्या मध्यस्थाने केला. डॉ. लॅसेलस नांवाच्या अेका (काल्पनिक) डाक्तराच्या भुताच्या साह्यानें तो बरे रोग करीत असे अशी त्याची ख्याती होती. जूलिअन हक्स्ले यांना काय रोग आहे असें विचारलें असतां त्याने हास्यास्पद निदान केलें, आणि त्याची फटफजिती झाली. त्याचप्रमाणें डीन, मिसेस कूपर, मूर भगिनी, यांचीही फजीती झाली.

सारांश जे अत्यंत प्रामाणिक म्हणून नांवाजलेले मध्यस्थ होते, अशांच्या नांवाला या प्रयत्नांनी चांगलाच काळिमा लागला. या सर्व प्रयोगांची हकीकत ऑक्टोबर, नव्हेंबर आणि दिसेंबर १९२६ मधील 'सन्डे क्रॉनिकल'च्या अंकांत सविस्तर छापलेली आहे. अिग्लंडांत व अमेरिकेंतही मध्यस्थांची चांगलीच फजीती झालेली आहे. धार्मिक वेडगळपणा ज्यापुढें कांहींच नाही, असा हा मृतात्म्यांवरील विश्वास प्रथमपासूनच लबाडीवर आधारलेला होता आणि आतां कोणीही समंजस मनुष्य असल्या वेडगळपणावर विश्वास ठेवणार नाही. (समाप्त).

---

# सक्ती

लेखक, स. हृदय, महाड.

मेट्रननें रागाने मारलेली हांक सुधाताअीच्या कानापर्यंत पोंचली, पण 'येतें मी ऑफिसांत,' असें नम्रतेनें सांगून त्यांनी मेट्रनला रवाना केलें.

सुधाताअी त्यांना ऑफिसांत भेटल्या. 'मी कामांत होतें, वेळेवर येतां आलें नाही,' सुधाताअींनी विनंति केली.

—तें जाऊं द्या, मी विचारतें त्याचें उत्तर अगोदर द्या. तुम्ही शालिनी-विषयीं ती बी. पी. अेन्. अे. आहे अशी मला कां खात्री दिली?

—मला क्षमा करावी. ती चांगली नर्स आहे, पण क्वालिफाअिड नाही हें मला माहीत होतें.

—मग कां तिला मिस् पारोळेच्या बदली आणली येथे तीन महिन्यांसाठीं?

—त्याला कांही कारणें आहेत.—काय आहेत?

—फार खाजगी आहेत तीं.

—पण तीं मला कळलीं पाहिजेतच.

—पण....मी कशी सांगूं?...माझ्याच्याने...

—तें कांही नाही. शरमायचें काय कारण?

सुधाताई मेट्रनला कारणें सांगूं लागल्या.—डॉ. द्रविडसाहेब गेलीं ८–९ वर्षें कायमचे हाऊस सर्जन आहेत, नव्हे, होते. हें आपलें निमसरकारी हॉस्पिटल आहे. अर्थात् त्यांची येथील जागा कायम स्वरूपाची होती.

—बरें मग?

—तीच आम्हा सर्व नर्सेसना तापदायक, नव्हे मानहानीची वाटली.

—काय म्हणून?

—आपणांला थोडेंबहुत माहीत असेलच.

—पण त्यांच्या कामांत तर ढिलाअी नव्हती ना? तसे ते कार्यतत्पर होते.

—तें मी नाकबूल करीत नाही. —मग?

—बाअीसाहेब, काय सांगू? नि कसें सांगूं? आम्ही कांहीजणी रात्रपाळीला असता, आपण नीट सर्वांची नेमणूक करतां, की आपलें काम झालें. दिवसा येऊन सर्व व्यवस्था ठीकठाक आहे की नाही हें पाहून...

—पण त्याच्याशीं डॉ. द्रविडांचा काय संबंध?

—तुम्हाला त्यांच्याविषयी खरें कसें कळणार? नि सांगणार कोण?

—तुम्ही सांगायला हवें होतें.

—मागें आम्ही सांगितलें होतें. आपण उत्तर दिलें कीं 'तुम्ही नर्सेसच पुरुषांना उत्तेजन देतां. तुम्ही धीट व्हा, पुरुष तुमच्या वाऱ्यासही उभा राहणार नाही,' म्हणून.

—बरें, सांगितलें होतें मी तसें.

—तेवढ्याने आम्ही साऱ्याजणी गप्प बसलों होतों, पण डाक्तरांचा उपसर्ग बेफाट वाढूं लागला. आम्हां सर्वांना त्यांची भीति, नि शिसारी वाटूं लागली.

—आपापलें काम चोखपणें बजावल्यावर द्रविडांना भ्यायचें कारण?

—खरें आहे, पण 'जावें त्यांच्या जन्मा तेव्हां कळे,' हें त्याहीपेक्षा खरें आहे.

—मी नाही समजलें.

—डाक्तरसाहेबांच्या हजार तऱ्हा असत. आमच्याविषयीं आपलें मन कलुषित करणारे रिपोर्ट आपणाकडे देत, नि आपण आमचें कांही अेक न अैकतां आम्हाला ताकीद देत असां.

—तुम्ही कामांत कसूर केली नि त्यांनी रिपोर्ट केला, तर काय बिघडलें? मला त्याचा विचार करून तुमची कानउघाडणी केलीच पाहिजे.

—पण आमची नुसती कानउघाडणी होती तर ठीक होतें. आमच्या सर्व्हिस बुकांत आपण शेरे मारीत असा.

—तसें केल्याशिवाय तुम्हा नर्सेसना शिस्त कशी लागावी?

—तें ठीक आहे, पण या कात्रींत सांपडलेल्या आम्ही नर्सेस... आमच्या असहायतेचा फायदा घ्यायला मर्यादा सोडणाऱ्या द्रविडांनीं कमी केलें नाही.

सुधाताऑंचे हे द्रविडांवर अेकदम आरोप करणारे उद्गार अेकून मेट्रन चपापल्या.—तुम्हांला काय सुचवायचंय ?

—स्पष्टच सांगतें सर्व कांहीं. द्रविड आपल्या अधिकाराचा उपयोग करून आमच्यापैकी कांही सुरेख मुलींना आपल्या घरीं बोलावीत. त्यांना विशिष्ट नर्सेस रात्रपाळीवर लागतात. गरीब बिचाऱ्या आपल्या नोकरीवर-पोटावर-पाय येऊं नयेत म्हणून प्रथम प्रथम प्रतिकार करीत राहूनही त्यांना वश होतात. कां म्हणून तुम्ही म्हणाल. आमच्यापैकी साऱ्याच नर्सेसना आपल्या पगारावर आप-आपलीं कुटुंबें पोसावीं लागतात. तसें नसतें तर आम्ही नर्सेस म्हणून कशाला राहिलों असतों ? आमच्यापैकी कुमारिका-अन् विधवा देखील-लग्नें करून आपल्या प्रिय पतीची नि बालकांची शुश्रूषा करीत राहिल्या असत्या. पण तसें जमत नाही, म्हणून आम्ही नर्सेस होऊन नोकरी करतों. म्हणून आम्ही आमची अब्रत, स्त्रीत्व, चारित्र्य, मानापमान, सर्व कांही खुंटीला टांगून येथे आलेल्या नसतों !

—सुधाताअी, तुम्ही आवेशांत आलां आहां. अितक्या भावनावश होऊं नका. बसा, येथे खुर्चीवर बसा पाहूं नीट अगोदर.

—या सर्व गोष्टींना गेल्या दोन महिन्यांपूर्वी तोंड फुटलें. बिचारी सुंदरा, बिचारीला नीट मार्ग कळला नाही. तिला हॉस्पिटलमधें आणून, तिच्या कबुली-जबाबामुळे तिला पापी, दुराचारी म्हणून हॉस्पिटलच्या गव्हर्निंग बोर्डाने तिला हांकलून लावली. आतां कशावर पोट भरीत असेल कोणास ठाऊक ? कोणाची रखेली म्हणून राहिल्याशिवाय तिला......

—सुधाताअी, हें तुमचें बिनमुद्याचें बोलणें वाढत चाललें. मी तुम्हाला विचारलंय की तुम्ही मला शालिनीविषयी कां खोटें सांगून फसवलें ? तिच्या नेमणुकीबद्दल बोर्डाने मला जबाबदार धरलें आहे. नि मी तुमच्यासारख्या सालस

नर्सवर विश्वास ठेवून तिला बदली म्हणून काम करूं दिलें. मला तो खुलासा पाहिजे. बाकीच्या फालतू गप्पा कशाला ?

—ठीक आहे. सुंदराच्या प्रकरणांतच आम्ही कांही नर्सेस अेके ठिकाणीं जमलों, नि सुंदराप्रमाणें आमच्यापैकी...न जाणों, द्रविडांच्या घाणेरड्या वृत्तीला बळी पडून विकारवशतेमुळें आमच्यावर पाळी यायची. तेव्हां त्याला उपाय काय करायचा याचा आम्ही खल केला, नि आम्ही ठरवलें...

—काय ठरवलें तुम्ही ?

—आमच्यापैकीं अेकीनें शालिनी नांवाची अेक सुंदर नर्स आपल्या ओळखीची असल्याचें मला सांगितलें. त्यावरून मी कु. पारोळे हिला आपल्या बहिणीच्या लग्नाच्या निमित्तानें तीन महिने रजा घेण्यास भाग पाडलें. तिचा बुडणारा पगार आम्ही वर्गणी करून द्यायची तिला हमी दिली. ती रजा काढून गेली. तिच्या बदली ठरल्याप्रमाणें शालिनीबाअी आली. नि आम्ही हिकमत लढवून पहिल्यापासूनच तिला रात्रपाळीवर ठेविलें.

—बरें, पुढें ?

—ती सुंदर, सडपातळ पण ठसठशीत अंगाची तरुणी आहे, तिचें हंसणें नि चालणें मोहक आहे, हें द्रविडांच्या नजरेस येण्यास वेळ लागला नाही. नि अेके दिवशीं जें व्हायचें तें झालें. तें सर्व तिनें मला येऊन सांगितलें. त्या दोघांचें चांगलेंच मेतकूट जमलें होतें. द्रविडांना शालिनीचा विश्वास वाटूं लागल्यावर अेक दिवस आम्ही मुक्रर केला. तिने त्या दिवशीं संध्याकाळीं ४-१५ चा बरोबर वेळ आम्हाला दिला. आणि नंतर आपणाला माहीत आहेच कीं मी डॉ. द्रविड आजारी आहेत असें सांगून बोर्डाचे सभासद डॉ. महंमूद, कांपाउंडर लेले, आणि नर्स माला नि पद्मा असे सर्वजण अचानक त्यांच्या घरीं जाऊन खोली ठोठावली आणि ठरावाप्रमाणें तिनें ती आंतून बंद केली नसल्यामुळें मी मुद्देमालासह चोर दाखवून दिला.—सुधाताअी गप्प राहिल्या. त्यांनी आपली मान खाली घातली. मेट्रनही या नर्सेसच्या कपटजालाच्या जालीम मात्रेनें स्तिमितच झाल्या.

—अस्सें !—मेट्रन उद्गारली. सुधाताआींना धीर आला. थोड्या वेळाने सुधाताआी उठल्या नि त्यांनी मेट्रनला, ' जाऊं का ? ' असें मानेनेच विचारलें.

—तुम्ही फार दुष्ट आहां सुधाताआी, माझा राग आहे तुमच्यावर.

—कां ? कसला ?—त्यांनी भीत विचारलें.

—माझ्या अशा वयांत तुम्ही तो घाणेरडा देखावा मला बघायला लावला. काय ती नागडी शालिनी ? कपडे बदलण्यासाठी तिची उडालेली धांदल, तें द्रविडांचें पांघरुणाखाली निजून राहिल्याचें ढोंग, राम ! राम ! राम ! नको तें दृश्य. तुम्ही खव्याळ आहांत. तुम्हांला कोणीं सांगितल्या होत्या या नसत्या उठाठेवी ?

—आमच्या हितासाठीं. द्रविडांचा नंगा नाच आम्हाला उघड्या डोळ्यांनी पहावेना. आतां तरी लागेल ना त्यांचा कायमचा सोक्षमोक्ष ? पुनः त्यांचें तें थोबाड, नि देवींचे वण पडलेलीं गालफडें, नि त्यांचा अगडबंब देह डोळ्यांसमोर दिसयला नको.

—खरें, पण शालिनी कशी अगदी लाज कोळून प्यायली ?

—कशी म्हणजे ? तिला आम्ही भरपूर मोबदला दिला. तिला काय, तिने असें कितीकजणांना पूर्वी पाणी पाजलें आहे.

—पक्कीच बदमाष दिसते ती बाआी.

—मला अेक विचारायचंय—सुधाताआींनी मेट्रनला विनंति केली.

—काय ?

—आतां तरी द्रविडांना शिक्षा होआील ना ? नोकरी गेली नाही तरी निदान बदली......

—छे छे ! बदलीवर नाही भागायचें. बोर्ड त्यांना काढून टाकीलसें वाटतंय. कां हो ?

—तसें कारण नाही. मागें सुंदराने आपल्या जबाबांत साफ द्रविडांचें

नांव घेऊनही तो आरोप खोटा असल्याचा कांगावा त्यांनी केला आणि निरपराध म्हणून सुटले. म्हणून म्हणतें.

—पण तुम्ही अगदी साग्रसंगीत जमवल्यानंतर......

—तसें केल्याशिवाय अितरांच्या दृष्टीने जरूर तो पुरावा कसा मिळणार ? बरें मी जाऊं ?

—छे छे ! मुख्य तें राहिलें. शालिनीविषयी खोटें बोलल्याबद्दल तुम्हाला शिक्षा झालीच पाहिजे.

—ती मी भोगायला तयार आहें—सुधाताअी निर्धाराने खुर्चीवर बसल्या. मेट्रनने बेल वाजवली. अेक छोटी नर्स आंत आली.

—दोन दुधाचे ओव्हलटाअिन्स घेऊन यायला सांग बाअीला.

कधी नाही त्या आज प्रथमच सुधाताअी नि मेट्रन अेकत्र अशा दिलखुलासपणें हंसल्या.

—आतां आपण जरा बरोबरीच्या नात्याने बोलूं. मला अेवढेंच विचारायचंय की...मींही आयुष्यभर नर्स म्हणून म्हतारी झालें. पण नर्सेसनीं अितकें हळुवार नि भावनाकुल असून भागत नसतें. आपण पण थोड्याफार गरजू असतों.

—खरें आहे. पण आम्हा नर्सेसना डोळे आहेत, हृदय आहे. आम्हांला सौंदर्याच्या नि रसिकतेच्या कल्पना आहेत. आमच्या खुषीवर अवलंबून असायला हवें सारें. द्रविडांसारख्यांच्या रानवट, सक्तीच्या अवहेलनेला, पाशवी वृत्तीला, आम्ही कां बळी पडावें ? नि तें आमच्या मनाविरुद्ध ?

—खरें आहे.—मेट्रन सहज उद्गारली.

---

# मराठी पत्रकारांचा अविचार

दिसेंबर १९ रोजीं येथें भरलेल्या मराठी पत्रकार संघाच्या सभेंत अेक मोठा विचित्र प्रकार घडला. पंचरंगी सामन्यांच्या बाबतींत, ते जातीय असल्या-

मुळें जातीजातींत वैमनस्य उत्पन्न होण्याचा संभव असतो, तेव्हां वृत्तपत्रांनीं त्यांची बातमी शक्य तितकी कमी द्यावी, असा अेक ठराव या सभेच्या कार्यकारी मंडळानें केला होता, तो साधारण सभेला अमान्य आहे अशा अर्थाचा ठराव श्री. अ. ह. गद्रे यांनीं सभेंत मांडला असतां डॉ. चिटणीस व श्री. पुरोहित यांनीं हा ठराव कार्यकारी मंडळावर अविश्वास दर्शविणारा आहे, तेव्हां तो फेटाळून लावावा, अितकेंच नव्हे तर तो पास झाल्यास आम्ही कार्यकारी मंडळाचे सभासद सर्वच राजिनामे देऊं अशी धमकी दिली. वस्तुतः ठरावाची भाषा अविश्वासाची नव्हती आणि अशा धमकीने तो नापास होऊं नये, अेतदर्थ आम्ही सांगितलें की कार्यकारी मंडळानें राजिनामा दिला तरी हरकत नाही, हा तत्वाचा प्रश्न आहे, कार्यकारी मंडळाने वृत्तपत्रांच्या मूळ उद्देशावरच घाला घातला आहे, तो आपण मुकाट्याने सहन करतां नये. यावर, या ठरावांतलें तत्व आतां लोकांना समजलें आहे, आतां श्री. गद्रे यांनी हा ठराव मागें घ्यावा, असा आग्रह श्री. पां. वा. गाडगीळ यांनी केल्यामुळे ते मागें घेण्यास तयार झाले. परंतु हा तत्वाचा प्रश्न असल्यामुळे तो मतास लागलाच पाहिजे अशा हेतूने आम्ही त्याला हरकत घेतली, आणि शेवटीं मतमोजणी करतां तो १७ विरुद्ध २२ मतांनी नापास झाला.

यावरून कांही सिद्ध झालें असलें तर तें हेंच की आपण धंदा काय करतों आणि त्यांतलें मर्म काय, हेंच मराठी पत्रकारांना अजून समजलें नाहीं. वृत्तपत्र याचा अर्थ बातमी देणारें पत्र असा आहे आणि त्याकरतांच त्याचा जन्म असतो. बातमी न दिली तर संपादकीय लेखांना कुत्रा देखील विचारणार नाही, हें तत्व टिळकांच्या आणि खाडिलकरांच्या केसरीने बरोबर ओळखलें होतें, परंतु हल्लींचे संपादक आणि बतमीदार देखील हें तत्त्व विसरले आहेत असें दिसतें, कारण हेच या संघाचे सभासद आहेत. सांगायला वाअीट वाटतें की बातमीच्या बाबतींत मुंबईतील सर्वांत उत्तम पत्र म्हणजे 'टाअिम्स ऑफ अिंडिआ' हें आहे, मग तें कितीही नावडतें असो. जातीय सामने असावे की

नाही हा प्रश्न अगदीं वेगळा आहे, पण जर ते होत आहेत, तर आम्ही त्यांची बातमी देणार नाही असा त्रागा वृत्तपत्रव्यवसायांतल्या लोकांना शोभत नाही. वृत्तपत्रांनी बातम्या नाही द्यायच्या तर काय हजामती करायच्या ? या सभेंत झालेल्या अकलेच्या प्रदर्शनावरून मराठी पत्रकार जगाच्या किती मागें आहेत हें कोणालाही दिसेल. वृत्तपत्रांच्या जगांत जर कांही पराक्रम असेल तर तो शत्रूच्या देखील गोटांत शिरून तेथील बातमी प्रसिद्ध करणें हा होय, आपणाला पसंत नसलेल्या गोष्टींची बातमी न देणें हा नव्हे. कितीही कट्टर युद्धविरोधी मनुष्य असला, तरी तो युद्धाची बातमीच मला नको असें म्हणणार नाही. आणि या मागसलेल्या पत्रकारांना लोक पुढारी मानतात ! देशाचें दुर्दैव आहे. समंजस पत्रकार कार्यकारी मंडळाच्या असल्या सूचनेला बिलकुल भीक घालणार नाहीत आणि हाच शहाणपणा होईल.

---

# कैफियत—२

लेखक, हितेच्छु.

**प्रास्ताविक.** आजकाल प्रेमवीरांचे अनेक नमुने पहायला सांपडतात. आणि नमुन्याबरहुकूम मुलगी मिळवण्याची पद्धत देखील निरनिराळी असते. कोणी हुशार म्हणून, कोणी सुंदर व पैसेवाला म्हणून, तर तिसरा खेळाडू म्हणून मुलींचें लक्ष आपणाकडे वेधून घेतो; तर कोणाचे लांब सडक केंस व कमानदार भुंवया, तर कोणाची नाजुक व सडपातळ देहयष्टि मुलांचें चित्त आकर्षण करते. हें सगळें असूनही मुलांमुलींना श्रीमंत सासरा नको असतो असें नाही. प्रेमाचे प्रकार व मुदत संपून विवाहाची पाळी आली की वरील बाबीचा पहिल्याने विचार केला जातो. मुलाच्या किंवा मुलीच्या आईची संमति जमेस धरली काय किंवा न धरली काय, सारखेंच. कारण विवाहाची वेळ येईपर्यंत शेंकडा

८० टक्के तौ मुलाकडे किंवा मुलीकडे झुकलेली असते. तिला मुलीला सुंदर व नीटनेटका नवरा मिळावा हीच अिच्छा असते. तेंच अर्थात् मुलाच्या बाबतींत. वरचीं व्यंगेंच तिला जास्त जाणवतात. अंतरंगांत शिरणारा असा बापच. पण प्रेमाचे प्रकार अशा थराला गेलेले असतात की मुलगा चांगला किंवा वाअीट हा विचार करण्याला मुलीच्या बापाला फारसा वेळच मिळत नाही. संमति न देण्यापेक्षा देणेंच परवडतें. मुलीच्या आवडी निवडी ओळखून टापटिपीनें राहणारा व गोड बोलणारा मुलगा असला की तो चटकन् मुलीच्या मनांत भरतो. शिवाय वयपरत्वें अेकमेकांकडे आकर्षण होतें तें निराळेंच. असल्या विवाहाला प्रेमोत्तर विवाह हें नांव मिळतें. दोघेंही शिक्षणाने व बुद्धीने तुल्यबल असलीं म्हणजे पश्चात्तापाची वेळ येत नाही. पण तशीं जोडपीं विरळाच. बरींचशीं भांडीं वाजत नाहीत याचें कारण दोघांपैकी अेक समंजस व हुशार असतें हेंच होय. तसें नसलें म्हणजे मात्र भानगड उभी राहते.

पुढील कैफियत याच स्वरूपाची आहे. नवरा उच्च शिक्षण घेतलेला असला तरी शिक्षणाचे संस्कार त्याच्यावर योग्य त्या तऱ्हेचे नसल्यामुळे जगांत कसें वागावें हें ठरवण्याच्या अगोदरच दोघांचें बिनसतें व दोघांना अेके ठिकाणीं आणणाऱ्या गोष्टी पैसा व सौंदर्य ह्याच असल्यामुळे त्या बाबींना ओहोटी लागतां-क्षणींच दिखाऊ प्रेमाचा सांठा संपतो. तेवढ्यांत अेखादें मूल वगैरे झालें असतें तर पुढील प्रकार टळण्याचा संभव होता. या सगळ्याचा दृश्य परिणाम पुढील झाल्यास नवल काय ?

## २

माझें नांव × ×. घरांतच नव्हे तर शेजाऱ्यांनी देखील तारीफ करावी अितकी मी सुंदर. माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुढील शिक्षणाकरतां अेका चांगल्या संस्थेंत नांव दाखल केलें. आपलें उच्च शिक्षण संभाळून कांही विद्यार्थी तेथें आळीपाळीनें शिकवायला येत. त्यांतील एकाशीं माझा परिचय झाला. परिचयाचें स्नेहांत व स्नेहाचें प्रेमांत रूपांतर झालें. जोडीला वडिलांची श्रीमंती

असल्यामुळे प्रेमाची परिणति विवाहांत व्हायला वेळ लागला नाही. अेक उच्च शिक्षण घेतलेला तरुण आपला जांवअी होत आहे म्हणून वडिलांनाही आनंद झाला, जांवअीबुवांना पैशाची चणचण होतीच, श्रीमंत श्वशुर मिळाल्याने तेहि खूष झाले.

अशा परिस्थितींत आमचा संसार सुरू झाला. वडिलांच्या व त्यांच्या मित्रांच्या मदतीने, थोडी उशीरां कां होअीना, बऱ्यापैकी नोकरी लागली. अेक नमुनेदार जोडपें म्हणून लोक आमच्याकडे कौतुकाने पहायला बोलायला लागले. नोकरीच्या निमित्ताने बऱ्यावाअीट लोकांशीं परिचय व्हायला लागला. वेळीं अवेळीं कामास पडणारी श्वशुरांची संपत्ति, आपलें काम करण्याकरतां जमणारें होयबा व स्तुतिपाठक मित्रमंडळ, व अितरांपेक्षा मी निराळाच आहें अशा तऱ्हेचा झालेला स्वतःविषयीचा ग्रह, यामुळें स्वारीला निराळेंच वळण लागलें. वरून गोड पण आंतून मतलबी असा मित्रपरिवार वाढायला लागला. हें मैत्रीचें लटांबर बाहेरच होतें तोंपर्यंत ठीक होतें, पुढें तें चुलीशीं यायला लागलें. त्याची जाणीव मीं त्यांना करून दिली, त्यावर त्यांनी साहेबी थाटाचें उत्तर देऊन मलाच वेड्यांत काढलें. साहेबांबरोबर माझीही तारीफ व्हायला लागली. साहेब–मेमसाहेबांना बरचेवर प्रेमाचीं आमंत्रणें यायला लागलीं. साहेबांचें वैभव व बोलबाला वाढत गेला. फिरतीवर दोघेंही बरोबर जायला लागलों. बोलावणींच तशीं प्रेमाचीं ! साहेबांचा बराचसा वेळ काम करण्यापेक्षा मित्ररंजनांत व अितर भानगडींत जाऊं लागला. नेहमीच माझें जाणेंयेणें त्यांच्या-बरोबर जमेना. असेही कांही दिवस गेले. तेवढ्यांत कांही लफडीं त्यांच्या अंगाशीं आलीं. त्यांचेंही निवारण वडिलांच्या पैशाने व मदतीने झालें.

मित्रमंडळीचीं भीड चेपली. साहेबांवर ते निरनिराळे प्रयोग करूं लागले. अेकदोन प्रसंग असे आले की वडिलांकडून मदत होऊं शकली नाही. वडिलांना त्यांच्या भानगडींचा सुगावा लागला असावा. लगेच संक्रांत माझ्यावर फिरली. मीच त्याबाबत जबाबदार धरलें गेलें, व धुसफूस सुरू झाली. आतांपर्यंत मला

मूलबाळ झालेलें नव्हतें. अडाणी अर्धशिक्षित नवऱ्यांनी बायकोला छळून पैसे उकळल्याचें अैकलें होतें, पण सुशिक्षित नवरेही तसें करतात याचा अनुभव माझ्याच बाबतींत पूर्णत्वाने आला. दोघांचेंही कौतुक करणारें मित्रमंडळ आतां माझ्यावर उलटलें. भलत्याच गोष्टींचा माझ्या चारित्र्याशीं संबंध जोडण्यांत आला. चोवीस तासांतून पांच मिनिटें देखील मनःस्वास्थ्य लाभेनासें झालें. पुढें काय होणार आहे याची कल्पनाच करतां येअीना. अगदीं कंटाळून गेलें. नको तें जीवन, असें वाटायला लागलें. थोडा विरंगुळा पडावा म्हणून माहेरीं जाऊन परिस्थिति निवळण्याची वाट पाहिली, पण व्यर्थ. अितर प्रतिष्ठित लोकांचे प्रयत्न देखील फुकट गेले. वडिलांना अखेरचा शब्द पाठवला गेला की आपल्या मुलीचें व माझें नातें संपलें. आटोपला संसार!

आतां अैकतें की त्यांनी मागील बाबींचा मागमूसही न लागूं देतां शिताफीने दुसरें लग्न करण्यांत यश मिळवलें आहे. वडिलांना असें म्हणतांना अैकलें की चार सुज्ञ अशा मित्रमंडळींनी वाखाणलेला व होतकरू असा मुलगा पाहून मुलीचें लग्न केलें. याउपर दुसरें मला काय करतां येणें शक्य होतें? अीश्वर त्यांना सुखांत ठेवो!

---

# शारदेचें पत्र

विल्सन कॉलेजबद्दल लोकांनी जी ओरड चालवली आहे, तीवरून कालेजच्या अधिकाऱ्यांची परिस्थिति त्यांच्या लक्षांत आलेली नाहीं असें दिसतें. बायबलचा वर्ग सर्वांना सक्तीचा करणार, आणि हा हुकूम मुकाट्याने न अैकल्यास आम्ही कालेज बंद करूं, अशी धमकी त्यांनी दिली आहे असें म्हणतात. ख्रिस्ती किंवा अितर कोणत्याही धर्माच्या सक्तीच्या प्रचाराविरुद्ध ओरड करणें

गैर नाही हें मला कबूल आहे, पण अशी धमकी त्यांनी कां दिली हें पाहणें जरूर आहे. विल्सन कालेज मिशनऱ्यांनी चालवलेलें आहे आणि तें चालवण्याकरतां त्यांना स्कॉटलंडमधील धार्मिक लोकांकडे भीक मागावी लागते, हें विसरून चालणार नाही, धार्मिक लोक जे पैसे देतात, ते धर्मप्रसाराकरतां देतात, केवळ शिक्षण देण्याकरतां नव्हे, आणि विल्सन कालेजांत बायबलच्या वर्गापलीकडे धर्म प्रसार होत नाही हें लक्षांत घेतलें तर त्यांना हा वर्ग तरी सक्तीचा करणें कां भाग पडत असेल हें सहज समजेल. तो वर्ग सक्तीचा केला नाही तर धर्मप्रसाराचा प्रयत्न तरी आपण करतों असें दाखवायला त्यांना कोणताही पुरावा देतां येणार नाही आणि त्यांना धार्मिक लोक पैसे देणार नाहीत आणि कालेज बंद करावें लागेल, असा त्या धमकीचा अर्थ आहे. हल्ली सर्व कालेजांत गर्दी असते आणि विल्सन कालेज हें त्यांतल्या त्यांत स्वस्त कालेज आहे, हें लक्षांत घेतलें तर तें बंद होणें अिष्ट नाही हें सहज दिसेल. आणि मला तर असें वाटतें की बायबलच्या वर्गाला गेल्याने कोणी ख्रिस्ती होअील हें अशक्य आहे. जे ख्रिस्ती होतात ते बायबल वाचून होत नाहीत, ते नोकरीकरतां किंवा सामाजिक दर्जाकरतां किंवा अशाच कांहीतरी वैयक्तिक स्वार्थाकरतां होतात, बायबल वाचून खात्री झाल्यामुळे नव्हे. अितकेंच नव्हे तर अमुक एक मनुष्य ख्रिस्ती होण्याची जर भीति असेल, तर त्याला सक्तीने बायबल वाचायला लावल्यास तो होणार नाही. बायबलांत इतका मूर्खपणा आहे की तें वाचून कोणाला पटणें शक्यच नाही. निदान कालेजांत जाण्याअितकें ज्यांचें शिक्षण झालेलें आहे त्यांना त्यांतला मूर्खपणा सहज दिसेल आणि ते तेवढ्याने ख्रिस्ती होणार नाहीत.

अेका बोलपटांत किती मूर्खपणा असूं शकतो हें जर पहायचें असेल तर 'तानसेन' बोलपट पहावा. त्यांत आरंभींच अेक व्याख्यान दिलें आहे की हें कथानक अैतिहासिक दृष्ट्या खरें आहे असें नाही, कलेच्या दृष्टीने त्यांत फरक केलेले आहेत. पण असें असेल तर त्याला 'तानसेन' अैवजीं दुसरें अेखादें नांव देणें बरें झालें असतें. नांव अैतिहासिक असेल तर कथानक देखील निदान

महत्वाच्या बाबींपुरतें तरी अैतिहासिक असणें बरें. पण तें अेक असो. तानसेनाला जर हिंदुस्थानांत आजपर्यंत झालेल्या संगीतज्ञांतला सर्वांत श्रेष्ठ म्हणायचा असेल, तर हें कथानक निदान ज्याला संगीत कशाशीं खातात हें थोडेंबहुत माहीत असेल अशा एखाद्या माणसाने लिहायला पाहिजे होतें. तसें यांत दिसत नाही. यांत जे चमत्कार दाखवले आहेत, ते एखाद्या पौराणिक बोलपटाला शोभले असते किंवा फारतर अेखाद्या संताच्या चरित्रांत शोभले असते पण तानसेनाला कोणी संत मानीत नाही, तेव्हां त्यांत चमत्कार घालण्याचें वास्तविक कारण नव्हतें. संगीतांतही कांही पौराणिक चमत्कारांच्याच धर्तीच्या समजुती आहेत हें मला माहीत आहे. उदाहरणार्थ दीपक राग आळवला तर दिवे लागतात अशी समजूत आहे. तसें या बोलपटांत दाखवलें आहे अितकेंच नव्हे, तर सबंध कथानकच या चमत्कारावर आधारलेलें आहे. यामुळे हा अैतिहासिक बोलपट तर नाहीच, पण तो पौराणिक बोलपट झाला आहे. तानसेनाचें अेका खेडवळ मुलीवर प्रेम असतें आणि अकबर या दोघांची मुद्दाम ताटातूट करतो, कारण विरहव्यथेने व्याकुळ झाल्यावर तानसेन अधिक चांगलें गाअील अशी त्याची समजूत असते. अशा स्थितींत अकबरची मुलगी आजारी पडते आणि तिच्या आग्रहावरून तानसेन तिच्यासमोर दीपक राग गातो आणि तेवढ्याकरतां मुद्दाम मालवलेले दिवे गायनाने पुन्हा लागतात. हा चमत्कार पाहिल्यावर मुलगी बरी होते, पण दिवे लागण्यास पुरेशी उष्णता निर्माण झाल्यामुळे तानसेनाच्या अंगाचा दाह होऊं लागतो. अकबर आपला हकीम बोलावतो पण उपयोग होत नाही. आणि शेवटीं बिरबल अशी माहिती (!) सांगतो की दीपक रागाने उत्पन्न झालेला दाह मेघमल्हार गाअिल्यानेच बरा होअील, अितर कोणताही उपाय चालणार नाही. अकबर दंवडी पिटवून हा राग गाणाराकरतां मोठें अिनाम जाहीर करतो, पण कोणीही मिळत नाही. शेवटीं तानसेन मरण्यापूर्वी आपल्या मित्राला भेटण्याकरतां मेण्यांतून निघतो, आणि वाटेंत त्याच्या प्रेयसीची अेका विहिरीशीं गांठ पडते आणि ती मेघमल्हार राग गाऊन त्याचा दाह शांत करते असें दाखवलें आहे. दीपक रागानें दिवे लागणें हा जितका

मूर्खपणा आहे, तितकाच मेघमल्हार गाअिल्याने पाऊस पडणें हाही आहे. पण त्यांत आणखी अेक मूर्खपणा असा की तानसेनसारखा गायक ज्या काळांत निर्माण झाला, त्या वेळीं या मुलीशिवाय मेघमल्हार गाणारा कोणीच सांपडूं नये काय ? निदान तो ज्या गुरूजवळ शिकला असें तोच सांगतो, त्यालाही हा राग येत नव्हता काय ? किंवा हा पाऊस पाडण्याचा शास्त्रीय शोध तानसेनानेच लावला होता आणि तो त्याने फक्त त्या मुलीला शिकवलेला होता असें समजायचें ? पण तो तिला गायन शिकवीत होता असेंही दाखवलेलें नाही. तेव्हां कलेचा संभाव्यतेशीं कांही संबंध असतां नये अशी या लेखकाची कल्पना दिसते. याच जातीचा आणखी अेक मूर्खपणा म्हणजे तानसेन जेव्हां प्रथम अकबरच्या दरबारांत जातो, तेव्हां तेथे गायन चाललेलें असतें आणि तानसेन त्यांत चूक काढतो आणि अकबरला याचें आश्चर्य वाटून तो त्याला गायला सांगतो. त्याला साथ कोणी करायची असा प्रश्न निघाला असतां तो म्हणतो की मला कसल्याही साथीची जरूरी नाही, माझ्या गुरूने मला सांगितलें आहे की राग बरोबर गायल्यास सगळीं साथीचीं हत्यारें आपोआप वाजूं लागतील. आणि तो कोणत्याही हत्याराशिवाय गायला सुरवात करतो आणि कांही वेळाने सर्व हत्यारें स्वयंस्फूर्तीने आपोआप वाजूं लागतात ! या मूर्खपणाला शास्त्रीय आधार काय, तर अेखादी तार अमुक सुराला लावली असली आणि त्या तारेजवळ तोच सूर जर वाजवला, तर ती तार आपोआप थरथरूं लागते. आणि तरफेच्या सतारींतल्या ज्या खालच्या तारा असतात त्यांतलें तत्व हेंच आहे. त्या बरोबर लावलेल्या असल्या तर आपोआप वाजतात. पण जवळ तबला ठेवलेला असेल तर त्यावरही आपोआप थाप ( कोणाची ? ) पडेल आणि तोही आपोआप वाजूं लागेल, असें म्हणणें हें या शास्त्रीय तत्वाचें बिडंबन आहे, अज्ञानाचें प्रदर्शन आहे. पण तबल्यासकट सर्व हत्यारें वाजूं लागतात असें या बोलपटांत दाखवलें आहे. हा आचरटपणा नव्हे तर काय ? अेकतर पूर्वी गायन चाललें होतें, त्या गायकाकरतां तीं हत्यारें लावलेलीं होतीं आणि तीं तानसेनाच्या सुरांशीं मिळवण्याचा कोणी प्रयत्न देखील केलेला नव्हता, कारण त्यानेंच सांगितलें की मला साथ नको. अशा स्थितींत त्याच्या-

पासून बऱ्याच अंतरावर ठेवलेलीं तीं हत्यारें आपोआप वाजूं लागतील हा कल्पनेचा खेळ आहे, चमत्कार आहे, शक्य गोष्ट नाही. बरें तानसेनच्या अंगीं कांही दैवी शक्ति होती असेंही कोठे दाखवलेलें नाही. अेकदां तो आपल्या गायनानें मस्त हत्तीला शांत करतो असें दाखवलें आहे, पण तें संगीताच्या प्रभावाने, दैवी शक्तीने नव्हे. आणि दैवी शक्ति असली तर त्याच्या अंगाचा दाह होऊन तो मरणाच्या पंथाला कां लागला? सर्वांत गंमत अशी की तानसेन अेकटा असतांना तो तंबोरा वाजवून गातो. तेव्हां तो आपोआप कां वाजत नाही? अेकंदरींत सगळाच आचरटपणा आहे झालें. समंजस लेखक आणि दिग्दर्शक किती कमी असतात हें यावरून दिसतें.

तुझी **शारदा.**

---

**दांतांचें आरोग्य.** दांत साफ करण्याचा सर्वांत उत्तम मार्ग म्हणजे ते ब्रशाने उभे वर खालीं चांगले घासणें हा होय. दांतांचा जेवढा म्हणून उघडा भाग असेल तेथपर्यंत, फटींत सुद्धां, ब्रशाचे केंस पोंचले पाहिजेत. अमेरिकेंतील 'कौन्सिल ऑफ डेन्टल थेरॅप्यूटिक्स' ने घरच्याघरीं करतां येण्यासारखें अेक दंतमंजन सुचवलें आहे. तें म्हणजे अेक भाग स्वच्छ पांढरें पूड केलेलें मीठ आणि तीन भाग 'बेकिंग सोडा' ( सोडिअम् बायकार्बोनेट—खाण्याचा सोडा ) यांचें मिश्रण. अितर टुथ पेस्ट किंवा पावडर यांची चव जास्त चांगली लागल्यास त्यांपैकी कांहीही वापरण्यास हरकत नाही. पण त्यांत कांही विशेष गुण असतात अशी स्वतःची दिशाभूल करून घेऊं नये. कोणतेंही दांतवण घ्या—मग तें नळींतून फितीसारखें बाहेर येणारें असो, नाहीतर डबींतील पूड असो—त्याचा उपयोग केवळ ब्रशानें घासण्यास मदत करण्यापुरताच असतो. त्यांत दांतांचे रोग बरे करण्याचा औषधी गुणधर्म कांहींच नसल्यामुळें सगळीं सारखींच, निवड करण्यासारखें त्यांत कांहीच नसतें हें लक्षांत ठेवावें. ( रीडर्स डायजेस्ट, ऑगस्ट १९४३ )

---